

# शासकीय अधिकाऱ्यांच्या बंगल्यावरील चंदन चोरणारे अटकेत

## गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) -** गेल्या काही वर्षांपासून अमरावती शहरात चंदन चोरांनी धुमाकूळ घातला होता. चंदन चोरांनी न्यायाधीश, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, वनाधिकारी यांचे बंगले टार्गेट करून चंदनाची झाडे चोरून नेली आहे. या टोळीचा पदार्फाश करण्यात अमरावती गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने यश मिळाले आहे. अमरावती पोलिसांनी कुख्यात आंतरराज्यीय चंदनचोर टोळीचा म्होरक्यासह दोघांना छत्रपती संभाजीनगर जिल्हा स्थित सिल्लोड तालुक्यातील अंबाई गावातून अटक केली आहे. या गुन्ह्यातील इतर आरोपींचा गुन्हे शाखेचे पोलिस कसोशीने शोध घेत आहे, अशी माहिती शनिवारी (दि.5) पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिली.

पोलिस सुत्रानुसार, ईसराईल खान ईस्माईल खान गोलवाल (24), झाकीर खान शेर खान (रा. दिक्षा भूमीजवळ, अचलपूर, जि. अमरावती) अशी अटक आरोपींची नावे आहेत. तर पसार आरोपी शाहीद खा अली खा कालेसे, असलम खॉन उमरखान पठान (सर्व रा. जंजाला, अंबाई, पो. स्टे अजींठा, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) यांचा शोध पोलिस घेत आहे. अमरावती येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश यांच्या कांतानगरातील निवासस्थानाच्या परिसरातून 5 वर्ष वयाचे चंदनाची दोन झाडे चोरांनी कापून चोरुन नेली होती. या घटनेची तक्रार 27 मार्च रोजी शुभम विनोदराव गोलाईत (28, रा. मच्छीसाथ, अमरावती) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी यांनी घटनास्थळाला भेटी दिल्या आणि सदर चोरीचा गुन्हा उघड करण्याचे दिशानिर्देश दिले. त्यानंतर आरोपींना अटक करण्यासाठी पाच पथके गठीत करण्यात आले होते. या गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना, गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने गोपनिय माहिती संकलीत केली असता आरोपींची टोळी ही छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील जंजाळा, घाटंब्री, नानेगाव व जालना जिल्ह्यातील कठोरा बाजार भागातील असल्याची माहिती पुढे आली.

या पथकाची कामगिरी

सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेडडी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, अरुण बा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमूख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमउददीन खतीब, नाझीम सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक अशोक खंगार, किशोर खेंगरे तसेच सायबरचे एपीआय अनिकेत कासार, पोलिस हवालदार निखील माहोरे, सुषमा आठवले व अनिकेत वानखडे यांनी केली आहे.

### महाराष्ट्रसह अन्य राज्यातही चोरली चंदनाची झाडे

अमरावती शहरातील शासकीय अधिकार्यांच्या निवासस्थानांवरील चंदनाची झाडे अनेकदा कापून चोरून नेण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांपासून अधून मधून चंदन चोरीच्या घटना पुढे येत होत्या. या चोरीच्या गुन्ह्यांची कबुली आरोपींनी दिली असून, आरोपींनी राज्यातील नागपूर शहरात, संभाजीनगर तसेच राज्यबाहेरही चंदन झाडांची चोरी केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. या आरोपींनी हा चंदनाचा माल कुणाला विकला, त्यालाही पोलिस ताब्यात घेणार आहे. हे आरोपी संभाजीनगर पोलिस विभागाच्या रेकॉर्डवरील आहे.

### अचलपूरच्या आरोपीशी संगनमत करून चोरली झाडे

संभाजीनगरातील या आरोपींनी अमरावती जिल्ह्यातील अचलपूरातील रहिवासी आरोपी झाकिर खान शेर खान याच्यासोबत संगनमत करून जिल्ह्यातील अनेक ठिकाणची चंदनाची झाडे चोरी केली आहे. हा आरोपी अमरावती जिल्ह्यात रेकी करून कुठे-कुठे चंदनाची झाडे आहेत, याची माहिती संभाजीनगरातील आरोपींना देत होता. त्यानंतर हे आरोपी चंदनाचे झाड हे परिपक्व आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्यासाठी संबंधित चंदनाच्या झाडाला छिद्र करून पाहायचे. ते झाड परिपक्व असल्याचे दिसताच, कापून चोरून नेत होते.

### वेषांतर करून अंभाई गावातील बाजारात रचला सापळा

अमरावती पोलिसांनी संभाजीनगरातील अंभाई गावात जाऊन आरोपींची माहिती काढली असता, गावातील बहुतांश लोक चंदनचोरीचे गुन्हे करण्याच्या सवईचे असल्याचे दिसून आले. तसेच त्यांना अटक करतेवेळी प्रतीकार होण्याची दाट शक्यता होती. आरोपी हे अजिठा लेण्याच्या जंगलात व दर्या खोर्यात लपण्याचे सवईचे होते. अशा परिस्थितीत पोलिसांनी मुस्लीम वेष परिधान करून अंभाईतील बाजारात सापळा रचला आणि आरोपी इसराईल ईस्माईल गोलवाल (24, रा. अंभाई, जंजाळा, छत्रपती संभाजी नगर) याला ताब्यात घेतले. त्यावेळी त्याने त्याच्या इतर साथीदांरचे मदतीने चंदन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी अचलपुरातील आरोपीला ताब्यात घेतले.

# विक्की मंगलानीचा करायचा होता गेम



## ■वादाला गुटखा तस्करीची किनार?
## ■तिनही उधमखोर पोलिसांच्या ताब्यात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) -** गेल्या काही वर्षात गुटखा तस्करीचे केंद्र म्हणून नावारुपाला आलेल्या जयस्तंभ चौकातील जयभोले केंद्र पानमटेरीयल दुकानावर शुक्रवारी रात्री 8 वाजता च्या दरम्यान गोळीबार झाला. यातील तीन आरोपींना कोतवाली ठाण्यातील डीबी पथकाने 5 एप्रिल रोजी बेलोरा टिपाईन्टवरून अटक केली. मोहम्मद आसीफ नुर मोहम्मद (26, रा. रजानगर, बडनेरा), अंकुश राजेंद्र शेंडे (27, रा. सोनगाव, ता. चांदुर रेल्वे) व अब्दुल शकील अब्दुल सत्तार (42, रा. टांगापुरा, चांदुर रेल्वे) अशी आरोपींची नावे आहेत. या आरोपींना विक्की मंगलानीला गेम करण्याची म्हणजेच जीवानीशी ठार मारण्याची सुपारी देण्यात आली होती. त्यामुळे सुपारी दिल्याच्या संशयावरून कोतवाली पोलिसांनी एका इसमाला ताब्यात घेऊन चौकशी सुरु केली आहे.

पोलिस सुत्रानुसार, 4 एप्रिल रोजी रात्री सागर संच्चानद मंगलानी (37, रा. न्यु कॉटन मार्केट, सहकार नगर, अमरावती) हा आपल्या जय भोले पान मटेरीयल दुकानात हजर होता. त्यावेळी 30 ते 35 वयोगटातील तीन अनोळखी दुकानात आले आणि त्यापैकी एकाने म्हटले की% विक्की कहा है, तेव्हा सागर म्हणाला की, विक्की बाहर गाव गया है% परंतू एक आरोपी म्हणाला की, मुझे विक्की से काम है और वो अभी चाहीये, त्यावेळी सागरने म्हटले की भैया मै झूठ क्यों बोलुंगा, आप दुकान में अंदर आओ, त्यावेळी त्यापैकी एकाने पाण्याच्या कॅनवरिल स्टीलचा लोटा सागरला फेकुन मारला, त्यांनी स्वत:ला कसेतरी वाचविले. त्यानंतर त्यातील पहील्या व्यक्तीने कमरेमधुन पिस्टुल (देशी कट्टा) काढली व सागर मंगलानी याच्यावर ताणून फायरींग केली.

त्याचवेळी सागर हा थोडा बाजुला सरकला, त्यामुळे त्यांचा जीव वाचला. परंतु त्यानंतर परत त्याने सागरवर देशी कट्टा ताणून फायर करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी देशी कट्ट्यातून केवळ आवाज आला आणि दुर निघाला. त्यावेळी गोळी चालली नाही. दरम्यान त्याच वेळेस दुसर्या व्यक्तीने कांउन्टरवरुन इलेक्ट्रीक काटा उचलुन काचावर मारला आणि तोडफोड केली. त्यानंतर त्यांनी सागर व दुकानात काम करणार्या व्यक्तीला काटा उचलुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला व तिसर्या व्यक्तीने पाण्याची कॅन उचलुन सागरला मारण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर त्यांनी शिवीगाळ करुन विवकीला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली आणि त्या तिघांनीही दुकानातुन बाहेर निघुन पळ काढला. या घटनेची तक्रार सागर मंगलानीने सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात दिली.

त्यानुसार पोलिसांनी आरोपींविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. या गुन्ह्याचा तपास करित असताना सिटी कोतवाली पोलिसांनी घटनास्थळावरील सिसीटीव्ही फुटेजवरुन आरोपींची ओळख पटविली. त्यांना तिन्ही आरोपींना 5 एप्रिल रोजी अकोला रोडवरील बेलोरा टी पॉईंटवर पाठलाग करून अटक केली.

### देशी कट्टा, मोबाईल जप्त

पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले 25 हजार रुपये किमंतीचे देशी कट्टा व मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी सदरचा गुन्हा दोन तासात उघडकीस आणला. पुढील गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनोहर कोटनाके करीत आहेत. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, एसीपी जयदत्त भंवर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक मनोहर कोटनाके, विजया पंधरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक रंगराव जाधव शशिकांत चिपडे, पोलिस हवालदार मलिक अहेमद, घनशाम यादव, दिपक श्रीवास, प्रमोद हरणे, प्रदीप राठोड, पंकज अंभोरे, आकाश इंगोले, मंगेश दिघेकर, अथर अली बेग यांनी केली.

### फायरिंगमागे गुटख्याची किनार?

विक्की मंगलानी याचा गुटखा व्यवसाय असल्याची चर्चा शहरात आहे. त्यामुळे गुटखा किंग म्हणून ओळखल्या जाणार्या विक्की मंगलानीवर काही व्यवहारातून हा हल्ला झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे. परंतू सुत्रांनुसार प्लॉट खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून या हल्ल्याची सुपारी देण्यात आल्याची माहिती पुढे येत आहे. या गुन्ह्याच्या चौकशीत पोलिसांनी विक्की मंगलानीची सुपारी देण्याच्या संशयावरून एकाला ताब्यात घेतले आहे.

# वसूली कर्मचाऱ्याचे 40 हजार रुपये लुटले


## पॅराडाईज कॉलनीकडे जाणाऱ्या रोडवरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5)** गाडगे नगर पोलीस स्टेशन परिसरातील पाठ्यपुस्तकांच्या दुकानातून पॅराडाईज कॉलनी रस्त्यावरून जाणाऱ्या एका वसुली कर्मचार्याला चाकूचा धाक दाखवून 40 हजार रुपयाने लुटण्यात आले. शिवकुमार सेलामुद्धू कौटर (44, रा. कॅम्प, अमरावती) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी 4 एप्रिल रोजी तीन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवकुमार कौटर हा फायनान्स कंपनीत रिकव्हरी एजंट म्हणून काम करतो. 4 एप्रिल रोजी सायंकाळी 6.25 वाजता, तो त्याच्या मित्रासह पाठ्यपुस्तकांच्या दुकानातून पॅराडाईज कॉलनीला दुचाकीवरून पैसे घेऊन परतत होता. यावेळी त्याच्या मागून दुचाकीवरून तीन जण आले. त्यांनी शिवकुमार यांच्या गाडीसमोर त्यांची गाडी थांबवली, त्यांना चाकू दाखवला आणि त्यांच्याकडून 40 हजार रुपये हिसकावून पळून गेले. या घटनेनंतर शिवकुमार यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तीन अज्ञात तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# आज रामनवमी उत्साहात साजरी होणार



## ■49 ठिकाणांवरून निघणाऱ्या मिरवणूका
## ■विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन
## ■पोलिसांचा राहणार चोख बंदोबस्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) -** शहरासह संपूर्ण जिल्ह्यात रविवारी (दि. 6) रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा होणार आहे. यासाठी राम मंदिरांची सुंदर सजावट करण्यात आली आहे. अमरावती शहरात विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, शहरातील 49 ठिकाणांवरून मिरवणूकी निघणार आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलिसांनी चोख बंदोबस्त लावला आहे.

गेल्या आठवड्यापासून अनेक मंदिरांमध्ये धार्मिक प्रवचन, भजन, कीर्तन सुरू आहे. विशेषत- राजापेठ स्थित राम मंदिर, भक्तीधाम, रविकिरण कॉलनी, छांगाणी नगर, सतीधाम मंदिर, इस्कॉन मंदिर आदींसह विविध राम मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या दिवशी प्रभू रामाच्या पूजेबरोबरच त्यांच्या जीवनाशी संबंधित विविध कार्यक्रमांचे आयोजन ही केले जाणार आहे. रामनवमी निमित्त ठिकठिकाणी रॅली, मिरवणुका काढण्यात आल्या आहेत. याशिवाय शाळा-महाविद्यालयांमध्येही रामाच्या जीवनावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

### सामाजिक कार्यक्रमातून साजरी होणार रामनवमी

धार्मिक कार्यक्रमांबरोबरच समाजसेवेची कामेही मोठ्या उत्साहात केली जाणार आहेत. अनेक ठिकाणी रक्तदान शिबिरे आणि गरिबांना कपडे व अन्न वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. रामनवमीच्या या शुभमुहूर्तावर लोक एकमेकांना शुभेच्छा देणार आहेत. रामनवमीचा हा सण आपल्याला एकता, प्रेम आणि शांतीचा संदेश देतो. त्यामुळे हा उत्सव सामाजिक एकोपा वाढवण्याचेही माध्यम ठरणार आहे. विविध कार्यक्रमांमुळे पोलीस प्रशासनाकडून ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## कुंभारगाव येथून बैलांची जोडी लंपास

**अमरावती -** रहिमापूर पोलीस स्टेशन परिसरातील कुंभारगाव गावातील रहिवासी विलास दादाराव पुंडकर (54) यांनी गोठ्यात बैलांची जोडी बांधून ठेवली होती. जे अज्ञात आरोपींनी चोरले होते. विलास पुंडकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सापन हनुमान मंदिरात चोरी, पुजाऱ्याला केले खोलीत बंद




**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर (दि. 5) -** परतवाडा-अंजनगाव मार्गावरील सावळी दातूरा येथील प्रसिद्ध सापन हनुमान मंदिरात चोरीची गंभीर घटना समोर आली आहे. शनिवारी पहाटे अज्ञात चोरट्याने मंदिरात प्रवेश करत, मंदिरात झोपलेल्या पुजाऱ्याला खोलीतून बाहेरून कोंडले आणि तीन दानपेट्या फोडून त्यातील रक्कम चोरून नेली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



मंदिर प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, चोरट्याने मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या उंबराच्या झाडावरून चढून मंदिरात प्रवेश केला. मंदिर परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये त्याच्या हालचाली कैद झाल्या आहेत. काही कॅमेऱ्यांची त्याने तोडफोड केली, तर काही कॅमेरे उलटे करून ठेवले, जेणेकरून त्याची ओळख लपवता येईल. चोरट्याने मंदिरातील तीन दानपेट्या फोडून त्यातील संपूर्ण रक्कम लंपास केली. चोरी किती रुपयांची झाली याचा अधिकृत तपशील समोर आलेला नसला तरी हजारोंच्या घरात रक्कम असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. हे मंदिर परिसरातील श्रद्धेचे केंद्र मानले जाते आणि दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येथे येतात. घटनेच्या वेळी मंदिराचे पुजारी खोलीत झोपेत होते. चोरट्याने खोलीच्या बाहेरून दरवाज्याला कोंडा लावला, त्यामुळे पुजारी बाहेर पडू शकले नाहीत आणि चोरट्याला चोरी करणे सुलभ झाले.

सकाळी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या लक्षात ही घटना आली. त्यांनी तत्काळ मंदिर समितीचे अध्यक्ष साहेबराव काठोडे यांना माहिती दिली. काठोडे यांनी परतवाडा पोलीस ठाण्यात माहिती दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे. चोरट्याचा शोध सुरू आहे.

# 1 कोटी 19 लाख 40 हजार रुपयांचा गांजा केला नष्ट

## बुटीबोरीतील एका कंपनीत जाळण्यात आला गांजा ● अमरावती शहर पोलिसांची नागपूरात कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) -** शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत आतापर्यंत पकडण्यात आलेला गांजाचा 597.079 किलो वजनाचा माल नागपूरच्या बुटीबोटीतील एमआयडीसीत 4 एप्रिल रोजी नष्ट करण्यात आला आहे. अमरावती पोलिसांनी हा माल महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड या कंपनीतील मशिनमध्ये जाळून नष्ट केला.

अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस स्टेशनला एन.डी.पी.एस ॲक्ट 1985 अंतर्गत दाखल असलेल्या एकुण 67 गुन्ह्यात 597.079 किलोग्राम अंमली पदार्थ गांजा जप्त करण्यात आला होता. याची किमंत 1 कोटी 19 लाख 40 हजार रुपये होती. यामध्ये अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील सन 1999 पासुन दाखल असलेल्या नागपुरी गेट येथील 43 केसेस, बडनेरा येथील 8 केसेस, गाडगेनगर येथील 6 केसेस, खोलापुरी गेट येथील 4 केसेस, राजापेठ येथील 3 केसेस, सिटी कोतवाली येथील 3 केसेस,



याप्रमाणे एकुण 67 केसेस समावेश होता. सदर केसेसचा न्यायालयीन निकाल लागल्यानंतर सदर केसेसमधील गांजा मुद्देमाल नाश करण्याचे पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी आदेशित केले होते. या आदेशानंतर पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांची त्रीसदस्यीय ड्रग डीस्पोजल कमीटी स्थापन करण्यात आली होती. सदर ड्रग डीस्पोजल कमीटीच्या आदेशाने मुंबईतील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून सदर गांजा मुद्देमाल नाश करण्याकरीता परवानगी प्राप्त करण्यात आली. त्यानंतर त्यांनी नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरीच्या एमआयडीसीतील महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड या ठिकाणी सदर गांजा मुद्देमाल नाश करण्याची परवानगी दिली होती. त्याप्रमाणे 4 एप्रिल रोजी सदर संपुर्ण 67 केसेसमधील गांजा मुद्देमाल महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड या ठिकाणी नेण्यात आला. यावेळी ड्रग डीस्पोजल कमीटी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेडचे मॅनेजर, दोन पंच, पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्या समक्ष कंपनीमध्ये इंसीनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या आदेशाने पोलीस उपायुक्त व सहायक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर, सहायक पोलीस निरीक्षक योगेश इंगळे, एएसआय कैलास सानप, पोलिस हवालदार अजय मिश्रा, सुधीर गुडधे, चालक अजय निस्ताने, नईम बेग, विशाल वाकपांजर यांनी केली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# महसूल मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांना थंड पेय देण्याचे आदेश; मात्र पण पैसा देणार कोण?



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 5)** उन्हाळा वाढल्याने हवामान खाद्यत्याच्या इशाऱ्यानुसार वेळेचे नियोजन करा, वर्गखोल्या थंड ठेवा, प्रथमोपचार आणि पेयजलाची सोय करा, पोषण आहारात मुलांना सरबत, ताक, ओआरएसचे पाकीट द्या, आदी सूचना महसूल मंत्रालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सर्व शाळांना केल्या आहेत. मात्र यासाठी पैसा कोठून आणायचा, हा प्रश्न शाळेच्या मुख्याध्यापकांसमोर आहे.

पोषण आहाराचे किंवा शाळांना साहित्यखरेदीसाठी मिळणारे अनुदान वेळेत मिळत नसताना आता या गोष्टींच्या खरेदीसाठी पैसा कोठून आणायचा, असा सवाल विचारला जात आहे. प्राप्त माहितीनुसार, शाळेत मिळणाऱ्या पोषण आहाराचे अनुदान वेळेवर मिळत नाही. या वर्षीचे अनुदान अद्याप शाळांकडे आले नाही. बऱ्याच शाळांमध्ये तांदूळ नव्हते, जे दोन दिवसांपूर्वी देण्यात आले. अनुदान वेळेत मिळत नसल्याने हा खर्च शिक्षक, मुख्याध्यापकांना करावा लागतो. त्यामुळे नव्या आदेशानुसार गोष्टींसाठी पैसा आणायचा कोठून, हा प्रश्न आहे.

उन्हाचा तडाखा लक्षात घेता पूर्वीप्रमाणे एप्रिलच्या सुरुवातीच्या काळात परीक्षा आटोपणे चांगले होते. मात्र शासनाने पहिली ते नववीपर्यंतच्या परीक्षा पुढे ढकलल्या. या परीक्षा 25 एप्रिलपर्यंत चालणार आहेत. यानंतर पाच दिवसांत पेपर तपासून 1 मे रोजी निकालही द्यायचा आहे. हे कसे साध्य होणार आहे, याचा विचार सरकारने केला नाही. आता हा आदेश थोपवून सरकारने शाळांना खर्चात पाडले आहे.

## या वर्षीचे शाळा संयुक्त अनुदान अजूनही मिळालेले नाही

अनेक शाळांमध्ये वीज बिल न भरल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. अशा वेळी पंखे, कुलर चालवायचे कसे? बऱ्याच शाळांमध्ये पंखेसुद्धा नाहीत. रोजचे इंधन, भाजीपाला अनुदान चार-चार महिने येत नाही. या वर्षीचे शाळा संयुक्त अनुदान अजूनही मिळालेले नाही. वर्षभर शिक्षकांनाच खर्च करावा लागतो. वरून उन्हाळ्याचा खर्च. हा सर्व खर्च करायचा कोठून?

**राजेश सावरकर,**
**राज्य प्रसिध्दी प्रमुख,**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

## पैसे आणायचे कोठून?

शासनाने दिलेले आदेश योग्य असले तरी या सर्व गोष्टी पुरविण्यासाठी पैसा कोठून आणायचा, हा प्रश्न आहे. साहित्य खरेदीसाठी लहान शाळांना 5000 व मोठ्या शाळांना 12500 रुपये शाळा संयुक्त अनुदान मिळते, जे यावर्षी मिळाले नाही. एखाद्या शाळेत 25 ते 30 मुले असतील, त्यांना जमेल; पण शंभर, दोनशे, अडीचशे विद्यार्थी असलेल्या शाळांना एवढा खर्च कसा करावा, हा प्रश्न आहे. पोषण आहारात ताक, सरबत यांसह संत्री, टरबूज, खरबूज, द्राक्षे, अननस, काकडी, कोथिंबीर, स्थानिक फळे, भाज्या व उच्च प्रमाणात पाणी असलेली फळे देण्यास सांगण्यात आले आहे.

## दुपारच्या सत्रात खेळ नको

सकाळच्या वेळी कवायती, खेळ आटोपावेत. दुपारी मैदानी खेळ व इतर हालचाली टाळाव्यात. बाहेर मैदानात वर्ग घेऊ नयेत. मुलांना उष्णतेच्या लाटेपासून बचावासाठी शिक्षित करावे. असेही आदेशात म्हटंले आहे.

# परतवाडा आगाराला मिळाल्या पाच नवीन लालपरी



## आमदारांनी सांभाळले एसटीचे स्टेअरिंग

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 5) –** जिल्ह्यातील दुसर्या क्रमांकाच्या परतवाडा आगाराला पाच लालपरी मिळाल्या असून, बुधारी नवीन करकरीत बसेसचे उद्घाटन आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते झाले. विशेष म्हणजे आमदार प्रवीण तायडे यांनी केवळ रिबन कापून या बसेसचे उद्घाटन केले नाही. त्यांनी लाल परीचे स्टेअरिंग हातात घेऊन ड्रायव्हर म्हणून प्रवाश्यांना एसटीने सफारीवर नेले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ही वाहतूक सार्वजनिक वाहतूक सेवा देणारी व्यवस्था आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी खाते स्वीकारल्यानंतर राज्यातील सर्व जिल्ह्यांना अशोक लेलँडव्दारे उत्पादित लालपरी पुरविली जात आहेत. बुधवारी सकाळी 11.45 वाजता स्थानिक परतवाडा आगारात आमदार प्रवीण तायडे यांच्या उपस्थितीत लालपरी ची विधीनुसार पूजा करण्यात आली. आमदार आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत, दीपप्रज्वलन करून आणि रिबन कापून या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी आमदार प्रवीण तायडे एवढ्यावरच थांबले नाहीत. चला एसटी बस चालवण्याचा प्रयत्न करूयाज असे म्हणत त्यांनी ड्रायव्हर सीटचा दरवाजा उघडला आणि आत चढू लागले, ज्याने तिथे उपस्थित असलेले एसटी अधिकारी आणि कर्मचारी आश्चर्यचकित झाले. सर्वांना वाटले की, हे फक्त फोटो सेशन असेल, परंतु आमदार तायडे यांनी हे सर्व खोटे ठरवले आणि तिथे उपस्थित असलेल्या एसटी अधिकारी आणि कर्मचार्यांना गाडीच्या चाव्या आणि ती कशी चालवायची हे विचारले. नवीन लाल परी बसमध्ये बसणार्या एका चालकाच्या मार्गदर्शनाखाली, त्याने बसचे स्टेअरिंग हातात घेतले आणि गाडी डेपो परिसरात फिरवली. हे पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. सरकारी वाहनाच्या स्टेअरिंगवर आमदार बसलेले पाहून तिथे उपस्थित असलेले प्रवासीही थक्क झाले.

पण दुसरीकडे, त्यांच्या मनात आमदार प्रवीण तायडे हे देखील आपल्यापैकीचे एक आहेत. अशी भावना स्पष्ट दिसत होती. उद्घाटन समारंभानंतर आमदार तायडे यांनी सर्वांना भेटून स्थानिकांशी संवाद साधला. परिसर पाहताना त्यांनी तेथील व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी परतवाडा आगाराचे व्यवस्थापक जीवन वानखडे, विभागीय तांत्रिक अभियंता धावडे, विभागीय वाहतूक निरीक्षक योगेश ठाकरे, कष्टकरी जनसंघ परतवाडा अध्यक्ष चित्तेशसिंग रघुवंशी, वाहतूक नियम निरीक्षक जयदीप घोडे, कास्तकरी जनसंघाचे विभागीय कार्याध्यक्ष सतीश कडू पाटील, परतवाडा आगाराचे अधिकारी उपस्थित होते. परतवाडा गोदाम कार्यशाळेचे अधीक्षक चोरमुले, अचलपूर शहर विभाग अध्यक्ष कुंदन यादव, ग्रामीण अध्यक्ष विशाल काकड, सरचिटणीस शंकर बसानी, प्रवीण तोंडगावकर, रूपेश ढेपे, रवी खंडेलवाल, वीरेंद्र उदापुरकर, युवा मोर्चा सरचिटणीस गौरव रघुवंशी, निलेश पवार, महेश पवार, सपत्नीक देवळे यांच्यासह आदि उपस्थित होते. सावरकर, मयंक शर्मा, मयूर वर्मा, पूरब खंडेलवाल, कृष्णा तिवारी यांच्यासह एसटी महामंडळ परतवाडा आगारातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाच्या तयारीत आणि नियोजनात कंडक्टर रूपाली घोडे यांनी विशेष सहकार्य केले.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांना 'भारतरत्न' देण्याची मागणी

**खासदार बळवंतभाऊ वानखडे यांची लोकसभेत मागणी**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 5) –** अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी लोकसभेत भारताचे माजी कृषिमंत्री व थोर समाजसुधारक डॉ. पंजाबराव देशमुख यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी जोरदारपणे केली.

यावेळी बोलताना खासदार वानखडे म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारतीय कृषी क्षेत्रात ऐतिहासिक कार्य केले आहे. त्यांनी हरित क्रांतीला प्रेरणा दिली, सहकारी बँकिंग आणि ग्रामीण शिक्षण प्रणाली मजबूत केली. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी त्यांनी संघर्ष केला आणि स्वतंत्र भारताचे कृषी धोरण तयार करण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत काम करून अस्पृश्यता निवारणात मोठे योगदान दिले. त्यांनी अमरावती येथे शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली, ज्यामुळे अमरावतीसह विदर्भातील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली, असेही खासदार वानखडे यांनी सभागृहात सांगितले. खासदार वानखडे यांनी पुढे बोलताना बेलोरा विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचा गौरव म्हणून आणि त्यांच्या स्मृतीला चिरस्थायी करण्यासाठी हे करणे आवश्यक आहे. खासदार बळवंत वानखडे यांनी सरकारला या संदर्भात तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य आणि योगदान हे केवळ अमरावती किंवा विदर्भापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# डीएचओ, टीएमओविरुद्ध हक्कभंग दाखल करा

## खा.अनिल बोंडे यांच्याकडे तक्रार



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर (दि. 5) –** येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या इमारत लोकार्पणाच्या नाम फलकावर जिल्ह्यातील जेष्ठ विधानसभा सदस्य, माजी कृषिमंत्री तथा वर्तमान स्थितीत संसदेच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य असलेले डॉ.अनिल बोंडे यांचे नाव नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यावरून आक्रमक होत स्थानिक अधिकाऱ्यांनी राजकारण करत जाणीवपूर्वक नाव डावलल्याचा आरोप भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांनी केला आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकाऱ्यांवर हक्कभंग दाखल करण्याची तक्रार त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या देवेंद्र फडणवीस, खा.डॉ.अनिल बोंडे यांच्याकडे केली आहे.

येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा 29 मार्च रोजी खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे यांच्या उपस्थितीत पार पडला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश आसोले, गटविकास अधिकारी कालिदास तापी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सचिन गोळे आदींची नावे इमारत लोकार्पणाच्या नाम फलकावर आहेत. मात्र राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे नाव नसल्याने या संपूर्ण उद्घाटनावर भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांनी गंभीर आक्षेप घेतला आहे. संसदेच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य असलेल्या जेष्ठ लोकप्रतिनिधीचा हा एक प्रकारे अपमान असल्याचे सोनटक्के यांनी तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी असलेले जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सचिन गोळे यांच्यासह लोकार्पण कार्यक्रमाला उपस्थित असलेले आरोग्य विभागाचे अधिकारी यांच्याविरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करावा अशी तक्रार सोनटक्के यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आंबीटकर, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, जिल्हाधिकारी सौरभ कटीयार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्याकडे केली आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत सायकलस्वार गंभीर जखमी

**अमरावती –** अज्ञात वाहनाच्या धडकेत सायकलस्वार जखमी झाला. गजानन विश्वनाथ शेंदरकर (52, रा. रामगंगानगर, नांदगाव पेठ) असे जखमीचे नाव आहे. ही घटना कठोरा रोडवरील ज्ञानोदय कॉन्व्हेंट स्कुलजवळ घडली. या घटनेची तक्रार अनंता सुरेशराव शेंदरकर (38, रा. रा. शिक्षक कॉलनी, नांदगाव पेठ) यांनी 2 एप्रिल रोजी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात वाहनाच्या चालकाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास नांदगांव पेठ पोलिस ठाण्याच्या ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी करीत आहे.

# युवा व्यापाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड (दि. 5) –** शेंदूरजनाघाट पोलिस स्टेशन हद्दीतील पुसला येथील एका व्यापार्याने कडुनिंबाच्या झाडाला ठिंबकच्या नळीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी (दि.2) दुपारी 12 वाजताच्या सुमारास घडली. आत्महत्या केलेल्या व्यापार्याचे नाव सचिन दामोधर खेरडे (35, रा. पुसला) असे आहे.

पुसला येथील वरपेठ परिसरातील माता मंदिराजवळ राहत असलेल्या यशवंत ट्रेडरचे संचालक सचिन खेरडे यांचे गावातीलच बसस्थानकावर लोहा सिमेंटचे दुकान आहे. सचिनचे आई वडील, पत्नी, 6 वर्षाची मुलगी, 4 वर्षाचा मुलगा तसेच त्याचा लहान भाऊ सुरज खेरडे व त्याची पत्नी असा आप्त परिवार एकत्रित राहतो. सगळे काही सुरळीत सुरू असताना अचानक पंढरी प्रकल्पाजवळील एका झाडाला दुपारच्या सुमारास सचिनचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती गावात पसरताच कुंटबीयांसह गावकर्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची माहिती शेंदुरजना घाट पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व सचिनचा मृतदेह खाली उतरून उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आला. वृत्त लिहेतोवर सचिनने आत्महत्या का केली असावी याबाबत कळू शकले नाही. पुढील तपास ठाणेदार दीपक महाडिक यांच्या मार्गदर्शनात संदीप वानखडे, सागर लेव्हरकर, विष्णू पवार करित आहे.

# अमरावतीचा कला-संस्कृतीचा वारसा नव्या पिढीने जोपासावा

**आ. संजय खोडके यांचे आवाहन | 'सांज पाडवा'तील कलाविष्काराने श्रोते मंत्रमुग्ध**




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 5)** अमरावती शहराला कला व संस्कृतीची गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. जुन्या पिढीतील कलावंतांनी आजतागायत हा वारसा जोपासून अमरावतीचे सांस्कृतिक क्षेत्र समृद्ध केले आहे. आता नवीन उदयोन्मुख कलावंतांनी सुद्धा अमरावतीचा सांस्कृतिक वारसा जोपासण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार संजय खोडके यांनी केले.


गुढी पाडवा निमित्य प्रशांत डवरे मित्र मंडळ व शिव संकल्प प्रतिष्ठान अमरावतीच्या वतीने कठोरा नाका स्थित स्वामी विवेकानंद थीम पार्क येथे आयोजित जाहीर सत्कार सोहळा व सांज पाडवा कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार सुलभा खोडके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष प्रशांत डवरे, माजी महापौर ॲड. किशोर शेळके, रीना नंदा, मनपा स्थायी समिती माजी सभापती अविनाश मार्डीकर, डॉ. भोजराज चौधरी, गझलरत्न डॉ. राजेश उमाळे, शिव संकल्प प्रतिष्ठानचे अध्यक्ष गजानन पागृत, होलीपीस इंग्लिश हायस्कुलचे संचालक शैलेश अमृते उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल संजय खोडके यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना संजय खोडके म्हणाले की, कुठलेही पद व कामामुळे आपले कर्तव्य व जबाबदारी वाढत असते. आजपर्यंतच्या आपल्या प्रत्येक कार्यात सर्व सहकारी व आपल्या माणसांची साथ दिली आहे.




यातूनच समाजाप्रतीचे ऋण फेडण्याची प्रेरणा व ऊर्जा मिळत असून पुढेही अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कसोशीने प्रयत्न करणार असल्याची ग्वाही खोडके यांनी दिली. यावेळी आ. सुलभा खोडके म्हणाल्या की, गुढी पाडव्यापासून मराठी नवीन वर्षाला सुरुवात झाली आहे. हा एप्रिल महिना विविध धर्मांचे सण-उत्सव व जयंत्याचा महिना असून त्यातून भारतीयांच्या विविधतेतील एकतेचे दर्शन घडते. या सण-उत्सवातून सामाजिक सद्भावना प्रस्थापित व्हावी, असे त्या म्हणाल्या.

यावेळी सुप्रसिद्ध गायक व संगीतकार गझलरत्न डॉ. राजेश उमाळे यांनी हिंदी-मराठी गीतांचा संगीतमय अविष्कार प्रस्तुत करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या बहारदार संगीत मैफिलीत त्यांना प्रसिद्ध निवेदक नितीन भट सहगायिका शीतल भट, तेजस कडू, ईश्वर कांबळे आदी कलावंतांनी साथसंगत केली. संचालन संदीप जुनघरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशाल भगत, निलेश ठाकरे, प्रज्वल घोम, सागर इंगळे यांनी परिश्रम घेतले.

# महापालिकेत ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वित होणार



100 दिवस कृती आराखड्यातून अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले प्रशिक्षण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 5)** मुख्यमंत्री यांच्या महत्वकांशी 100 दिवस कृती आराखड्यात सर्व महानगरपालिका व नगरपरिषदेमध्ये ई-ऑफिस प्रणाली लागू करण्याबाबत आदेश प्राप्त आहेत. सदर प्रणाली महानगरपालिकेत 5 एप्रिलपासून कार्यान्वित करण्यात येणार असून, यासंबंधाने 2 एप्रिल रोजी अधिकारी व कर्मचार्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

महानगरपालिका क्षेत्रात ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांच्या सूचनांनुसार मनपा स्तरावरील कार्यालयांमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणालीची माहिती देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातून प्रफुल्ल मेहेर व आशिष विधळे यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणालीअंतर्गत चालणार्या विविध कार्य आणि त्यांचा वापराबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रशिक्षणात, ई-ऑफिसचा परिचय आणि वापर, दस्तऐवज तयार करणे आणि मंजुरी प्रक्रिया, अहवाल देणे आणि फाइल ट्रॅकिंग, सुरक्षा उपाय आणि गोपनीयता इत्यादी गोष्टी सविस्तरपणे समजावून सांगण्यात आल्या. विभागांमधील कामकाज प्रणाली डिजिटल आणि कार्यक्षम बनवण्याच्या उद्देशाने ई-ऑफिस प्रशिक्षण आयोजित केले जात असल्याचे प्रफुल्ल मेहेर व आशिष विधळे यांनी सांगितले. ज्यामध्ये ई-ऑफिस प्लॅटफॉर्मचा योग्य आणि प्रभावी वापर शिकवला जात आहे. जेणेकरून काम डिजिटल पद्धतीने सुव्यवस्थित करता येईल. यामुळे कागदपत्रांची प्रक्रिया कमी होईल. ई-ऑफिस प्लॅटफॉर्मवर कागदपत्रांचे डिजिटल ट्रॅकिंग आणि कामाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि कार्यक्षमता, वेळेची बचत होईल. सदर प्रशिक्षणमध्ये आयुक्त सचिन कलंत्रे, उपायुक्त मेघना वासनकर, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, कनिष्ठ लिपिक ऋषिकेश चवरे, सॉफ्टवेअर अभियंता रोहन कुरील, प्रकल्प अभियंता पंकज मानवटकर, हार्डवेअर अभियंता चेतन रामटेके, तसेच सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना उपस्थित होते.

# पेट्रोल पंपावर लुटमार करणारे तीन तासात अटक

## मॅनेजरचा निघाला मोरक्या | स्थानिक गुन्हे शाखा व तळेगांव पोलीसांची संयुक्त कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) –** तळेगांव दशासर ते पुलगांव महामार्गावरील नागापुर येथे असलेल्या राघव पेट्रोलपंपावर लुटमार करणार्या पाच आरोपींना 5 एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखा व तळेगाव दशासर पोलिसांनी अवघ्या तीन तासात अटक केली. अभय नरेश राऊत (रा.जळका पटाचे), राहुल धनराज धोरते (23, रा.सालोड, ह.मु.जळका पटाचे), हतीक शंकर टेकाम (22, रा.येणस), समित चन्द्रकुमार कणसे (27) व श्रावण ऊर्फ लहान्या राजेन्द्र कणसे (19, दोन्ही रा.येणस) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी लुटमारीच्या या गुन्ह्याची कबुली दिली आहे. विशेष म्हणजे पेट्रोल पंपाचे मॅनेजर अभय राऊत यांनीच त्याच्या साथीदारांसह लुटमारीचा कट रचला होता.

पोलिस सुत्रानुसार, 4 एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास राघव पेट्रोल पंपावर काम करणारा सेल्समन राहुल धनराज धोरते (23, रा.सालोड, ह.मु.जळका पटाचे) व सार्थक नगराळे (19, रा. जळका पटाचे) यांच्या डोळ्यात मिरची पुड फेकुन त्यांना एका खोलीत बंद केले आणि त्यानंतर लुटारुंनी पेट्रोल विक्रीचे 3 ते 4 लाख रुपये घेऊन पोबारा केला. या घटनेची माहिती दुरध्वनीव्दारे पेट्रोलपंपाचे व्यवस्थापक अभय नरेश राऊतने यांनी तळेगांव पोलीस तसेच डायल 112 नंबरवर दिली. याबाबत पेट्रोल पंप मालक संतोष प्रेमचंद मुंदड़ा (54, रा. धामणगाव रेल्वे) यांना सुध्दा घडलेल्या प्रकाराबाबत माहीती दिली. त्यानंतर त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरुध्द तळेगांव दशासर पोलिस ठाण्यात आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेच्या माहितीवरून तळेगावचे एपीआय रामेश्वर घाडगे यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर चांदूर रेल्वेचे उप–विभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे हे पथकासह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनेची माहिती घेऊन आरोपींनी वापरलेल्या पांढर्या रंगाच्या वाहनाचा शोध सुरू केला, तसेच जिल्ह्यासह आजू–बाजूच्या जिल्ह्यातील पोलिसांना माहिती देऊन नाकाबंदी करण्यास सांगितले. दरम्यान पोलिसांनी पेट्रोल पंपाचा व्यवस्थापक व सेल्समन यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी सांगितलेल्या घटनाक्रमात तफावत आढळून आली. त्यामुळे पोलिसांना संशय निर्माण झाला. त्यामुळे पोलिसांनी सेल्समन व मॅनेजरला घटनेबाबत सखोल विचारपुस केली असता, त्यांनी सर्वप्रथम उडवा–उडवीची उत्तरे दिली. परंतू त्यांना विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता त्यांनीच गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे पोलिसांनी आरोपींना या गुन्ह्यात अटक केली. त्यांच्या ताब्यातून चारचाकी वाहन व 3 लाख 6 हजाराची रोख जप्त करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पुढील तपास तळेगांव पोलिस करित आहेत.

### या पथकाची कामगिरी

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उप–विभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक किरण वानखडे, तळेगावचे ठाणेदार रामेश्वर धोंडगे, पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार, मुलचंद भांबुरकर, अमोल राठोड, सचिन मिश्रा, शकील चव्हाण, बळवंत दाभणे, मंगेश लकडे, गजेन्द्र ठाकरे, दिनेश कनोजिया, सचिन मसांगे, रविन्द्र बावणे, सचिन गायधने, विनोद राठोड, भुषण पेठे, पवन अलोणे, संदेश चव्हाण, पंकज शेन्डे, अमर काळे, जितेन्द्र राऊत, बंड मेश्राम, गौतम गवळी यांच्या पथकाने केली आहे.

# शहरातील अनेक भागात अंधाराचे साम्राज्य

## अचलपूरातील अनेक भागांतील रस्त्यावरील दिवे बंद



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर (दि. 5) –** अचलपूर नगर परिषद क्षेत्रातील अनेक भागांमध्ये रस्त्यावरील दिवे अनेक दिवसांपासून बंद आहेत. फरमान पुरा, सुलतानपुरा, हिरापुरा गेट, ईदगा चांदूर नाका आणि जीवनपुरा, अचलपूर नाका, समरसपुरा यांसारख्या भागांमध्ये रात्रीच्या वेळी अंधार दाटलेला असतो. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की, रस्त्यावरील दिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असते. यामुळे अपघात, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी नगरपरिषदेकडे अनेकवेळा तक्रार केली, परंतु अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही. नगरपरिषदेतील अधिकारी समस्या सोडवण्यासाठी कोणतीही पावले उचलत नाहीत. वारंवार तक्रार करूनही दिव्यांची दुरुस्ती किंवा बदल केले गेले नाहीत. नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, लवकरात लवकर रस्त्यावरील दिव्यांची दुरुस्ती करण्यात यावी, जेणेकरून सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. अंधारामुळे अपघात, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांचा धोका वाढला आहे. शाळा–कॉलेजचे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक रात्री बाहेर पडण्यास घाबरतात. नागरिकांनी नगरपरिषदेकडे लवकरात लवकर रस्त्यावरील दिव्यांची दुरुस्ती करण्याची आणि त्यांची नियमित देखभाल करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने जबाबदारी स्वीकारून नागरिकांच्या समस्यांचे समाधान करावे, अशी अपेक्षा जनतेकडून व्यक्त हो आहे.

# मोर्शी बसस्थानकाला महात्मा फुलेंचे नाव द्या!

## भाजपच्यावतीने आगार व्यवस्थापकांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि. 5) –** मोर्शी येथे एसटी बसस्थानक पाडून नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होण्याचे मार्गावर आहे. अशातच या नवीन बसस्थानकाला क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी मोर्शी भाजपाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात नूकतेच मोर्शी एसटी आगार व्यवस्थापक आशा वासनिक यांना निवेदन देण्यात आले. मोर्शी बसस्थानकाला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देण्याकरिता सर्वप्रथम एक सभा घेऊन निवेदन देण्याचे ठरले. त्यानुसार आज भारतीय जनता पक्षातर्फे निवेदन देण्यात आले. त्यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रविण राऊत, बूथ प्रमुख बबलू रामटेके, दापोरी बुथ प्रमुख अंकुश धावडे, प्रविण थेटे, युवा मोर्चा अध्यक्ष नितीन



चिखले, शहर सरचिटणीस सतीश लेकुरवाडे, प्रफुल राउत, विशाल राउत, शिवा मेश्राम, मंगेश मेश्राम, सहकार आघाडी प्रमुख मानिष धर्माधिकारी, पार्डी येथील बुथ प्रमुख सुरज कोंडे आदी उपस्थित होते.

# मुट कोर्ट आणि जजमेंट रायटिंग स्पर्धा

### पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात आयोजन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5)** परिस्थिती कशी असली तरी अभ्यास करून गुणवत्तेत मिळविलेले यश हे चिरकाल टिकाऊ असते, असे प्रतिपादन सेवानिवृत्त न्यायाधीश व महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष सुनील शुक्रे यांनी केले. येथील डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातर्फे स्व. ॲड. बालकृष्ण शुक्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पहिली महाविद्यालयीन मुटकोर्ट व जजमेंट रायटिंग स्पर्धा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश सुनील शुक्रे बोलत होते. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश प्रवीण पाटील, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले यांची उपस्थिती होती.

महाविद्यालयातर्फेत या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला. मूट कोर्ट स्पर्धेसाठी एकूण 32 चमूंनी भाग घेतला तर जजमेंट रायटिंग स्पर्धेत 50 पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या उद्घाटनाला ॲड. अमर देशमुख व ॲड. प्रदीप महल्ले यांची उपस्थिती होती. डॉ. राजेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. अमर देशमुख यांनी विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रातील विधी करियर याबाबत मार्गदर्शन केले. तर प्रदीप महल्ले यांनी विद्यार्थ्यांना विधि विषयक कौशल्यावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी अध्यक्षीय भाषण केले.

बक्षीस वितरण समारंभात मार्गदर्शन करताना न्या. प्रवीण पाटील यांनी यांनी मूट कोर्ट व जजमेंट रायटिंग याचे विधी करिअरमध्ये असलेले महत्व विशद केले.

प्रा. डॉ. प्राची कडू यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. तर वैष्णवी पाचडे या विद्यार्थिनीने आभार मानले. यावेळी विजेत्यांना बक्षीस वितरीत करण्यात आले. मुटकोर्ट स्पर्धेत प्रथम पारितोषिक रेणू उत्तमणि, समृद्धी गिरी, कोमल चिरडे यांचा समावेश असलेल्या चमुने जिंकले. तर द्वितीय बक्षीस श्रावणी निस्ताने व रोमिसा खान यांच्या चमूने प्राप्त केले. जजमेंट रायटिंग स्पर्धेचे पहिले बक्षीस श्रावणी निस्ताने तर द्वितीय बक्षीस गायत्री बारब्दे या विद्यार्थिनींनी मिळविले. भाग्यश्री हरणे हिने बेस्ट रिसर्चचे बक्षीस पटकावले. बेस्ट मुटर म्हणून गौरी ककरानीया या विद्यार्थिनीने प्रथम बक्षीस मिळवले तर रेणू उत्तमानी हिने द्वितीय बक्षीस पटकाविले. उत्तेजनार्थ बक्षीस अल्फिया सईद व जयश्री हिवसे या विद्यार्थिनींना देण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून पराग कडू, कुलदीप महल्ले, आनंद ठाकरे, चैतन्य गावंडे, अभिजीत खोत, हितेश ग्वालानी, प्रथमेश तिवारी, मृण्मयी निस्ताने, हेलीना थोरात, चैतन्य अग्रवाल, अरिहंत कोठारी, पियुष बरसैया, गौरव राऊत, विशाखा बीडवई यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैभव इंगळे यांच्या नेतृत्वाखाली वैभव तायडे, दीपमाला चौव्हाण, ईश्वरी शिरभाते, राम गुल्हाने, यश मेहता, जाझी ओबेरॉय, शंतनू कणसे, सय्यम चौधरी, मुक्तीका कुबडे, खुशी तेजवाणी, गितीका जांबा यांनी प्रयत्न केले.

# उद्या जिल्हा लोकशाही दिन

**अमरावती –** जिल्हा लोकशाही दिन सोमवार, दिनांक 7 एप्रिल 2025 रोजी दुपारी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तरी संबंधितांनी अहवालासह व्यक्तिश– उपस्थित राहण्याचे आवाहन अधीक्षक निलेश खटके यांनी केले आहे.

# आमदारांनी घेतला नगर रचना विभागाचा आढावा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) –** आमदार संजय खोडके व आमदार सुलभा खोडके व महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली 4 एप्रिल, रोजी नगर रचना विभागाचा आढावा घेण्यात आला. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे याबाबत बैठक घेण्यात आली.

यावेळी आमदारांनी महानगरपालिकेमध्ये खाली भुखंड, डीपी रोड, शासकीय व खाजगी जागेवर आरक्षणाबाबत, मालमत्ता कर, ले–आऊट, नाली व रस्त्याचे बांधकाम, बांधकाम परवानगी बाबत या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करुन संबंधीतांना निर्देशित करण्यात आले. नविन लेआऊटची मंजुरी देत असतांना लेआऊट मध्ये संबंधीतांनी पाहणी करुन नाली बांधकाम करत असतांना वाहते पाणी साचणार नाही, याचे नियोजन व्यवस्थीपणे करावे, असे निर्देश आमदार यांनी दिले. सदर काम गतीमान व दर्जेदार करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले. नागरीकांच्या समस्या यावेळी त्यांनी जाणून घेतल्या. सदर काम हे अतिशय महत्त्वाचे असून ते त्वरीत पूर्ण करावे असे त्यांनी सांगितले. येणार्या अडचणी त्वरीत सोडवून सदर काम पूर्णत्वास त्वरीत न्यावे. सदर कामाची गती आहे त्यापेक्षा अधिक करुन नागरीकांना दिलासा द्यावा, असे यावेळी आमदार यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचना घनश्याम वाघाडे, अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# गणवेशाचा रंग व रचनाचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला

## आता मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी शाळा स्तरावर | शिक्षक समितीच्या मागणीला यश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 ) –** सन 2024–25 मध्ये एक राज्य, एक गणवेश ही योजना राज्य सरकारने राबविली, मात्र ती योजना निष्फळ ठरली. विद्यार्थ्यांना वेळेवर शालेय गणवेश मिळू शकले नाही. त्यामूळे स्थानिक पातळीवर निश्चित करुन सन 2025–26 मध्ये गणवेश खरेदीचे अधिकार शाळा व्यवस्थापन समिती देण्यात यावे अश्या मागणीचे निवेदन शिक्षक समितीकडून शासनाला व लोकप्रतिनिधी यांच्याकडे केली होती. ती शासनाने मान्य करत गणवेशाचा रंग व रचनाचे अधिकार आता शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहे, त्यामूळे आता विद्यार्थांना वेळेत गणवेश उपलब्ध होतील. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीमधील शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. सन 2023–24 च्या शैक्षणिक वर्षापासून राज्य योजनेतून प्रस्तुत योजनेचा लाभ दारिद्र्य रेषेवरील पालकांच्या मुलांना देखील देण्यात येतो. सन 2025–



26 या शैक्षणिक वर्षापासून मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्याचा निर्णय 20 डिसेंबर, 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच, सदर शासन निर्णयान्वये गणवेशाचा रंग व रचना निश्चित करण्यात आली होती. सदर शासन निर्णयामध्ये अंशत: बदल करुन मोफत गणवेश योजनेंतर्गत गणवेशाचा रंग व रचनादेखील स्थानिक पातळीवर निश्चित करण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीस देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासन निर्णयानुसार सन 2025–26 या शैक्षणिक वर्षापासून मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता आता शिक्षक समितीने पुढाकार घेतला आहे. अशी माहीती शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी दिल्याचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

### असे आहेत उपसचिवांचे आदेश

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात यावी. त्यासाठी समग्र शिक्षांतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेली गणवेशाची रक्कम व राज्य शासनाच्या मोफत गणवेशाची रक्कम शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयामार्फत विहित कालावधीत वर्ग करण्यात यावी. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेंतर्गत गणवेशाचा रंग व रचना संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने निश्चित करावी. ज्या शाळांमध्ये स्काऊट व गाईड हा विषय आहे, अशा शाळांनी नियमित एका गणवेशाची रंगसंगती शाळा स्तरावर निश्चित करावी. तसेच, दुसरा गणवेश स्काऊट व गाईड संस्थेने निश्चित केलेल्या रंगसंगतीप्रमाणे खरेदी करण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीस देण्यात येत आहेत. मोफत गणवेश योजनेंतर्गत वाटप करण्यात येणारे गणवेश विद्यार्थी शाळेत नियमित परिधान करीत असल्याने शाळा व्यवस्थापन समितीने गणवेश खरेदी करताना गणवेशाचे कापड चांगल्या दर्जाचे, विद्यार्थ्यांच्या शरीराला/त्वचेला इजा न करणारे असल्याची दक्षता घेण्यात यावी. सदर दोन्ही योजनांची अंमलबजावणी, संनियंत्रण करण्याचे कामकाज मुंबई येथील महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयाने विहित कालावधीत पूर्ण करावे. असे आदेश उप सचिव तुषार महाजन यांनी काढलेल्या शासन निर्णयात म्हटले आहे.

# समाजवादी पार्टीचे खासदारा विरोधात करणी सेनेचे निदर्शने




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5)** समाजवादी पार्टीचे खासदार रामजीलाल सुमन यांच्याविरोधात गुरूवारी अमरावती येथील श्री राजपूत करणी सेनेच्या पदाधिकार्यांनी आंदोलन केले. यावेळी सुमन यांच्या फलकास चपलांनी बदडविण्यात आले.

स्थानिक गणेश कॉलनी येथील श्रीमहाराणा प्रताप उद्यानातील वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने आंदोलन करण्यात आले. राजपूत करणी सेनेचे जिल्हाध्यक्ष संजयसिंह सिसोदिया यांच्या मार्गदर्शनात गुरूवारी सकाळी 10 वाजता आंदोलन करण्यात आले. समाजवादी पार्टीचे खासदार रामजीलाल सुमन यांनी पूर्वज राणा सांघजी यांच्या विषयी केलेल्या टिप्पणीचा निषेध नोंदविण्यात आला. यावेळी रामजीलाल सुमन यांच्या फलकास चपलांनी बदडविण्यात येवून घोषणा देण्यात आल्या. तसेच रामजीलाल सुमन यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात आली. श्री राजपूत करणी सेनेचे प्रदेश अध्यक्ष श्यामसिंह ठाकूर, प्रदेश मुख्य सचिव गुलाब सिंह ठाकूर, महिला युवा महाराष्ट्र अध्यक्ष कांचन ठाकूर, महाराष्ट्र उपाध्यक्ष धर्मसिंह, विदर्भ अध्यक्ष ललीतसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनात आंदोलन करण्यात आले. आंदोलनात पदाधिकारी संजय सिंह सिसोदिया, डॉ. जितेंद्रसिंह राजकुमार, मंगेशसिंह सूर्यवंशी, अतुलसिंह राजपूत, नरेंद्रसिंह येवतीकर आदी सहभागी झाले होते.